MHSN090013002021

# <u>सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली.</u>

(पीठासिन अधिकरी श्रीमती डॉ. आर.एस.कुळकर्णी)

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ६३/२००८.</u>**
**<u>निशाणी क्रमांक १२४ खालील आदेश.</u>**

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. गणपत एकनाथ म्हसवडकर वगैरे. | **<u>वादी</u>.** |
| | ***विरुध्द*** | |
| ०१. | श्री.किसन आप्पासो माळी वगैरे. | **<u>प्रतिवादी</u>.** |

**(०१).** प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १, २ व कलम १५१ नुसार तुर्तातूर्त मनाई मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांचे कथन की, वादींनी प्रस्तुतचा दावा निरंतर ताकिदीकरीता व अतिक्रमीत मिळकतीचा कब्जा मिळणेबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांचे कथन असे की, न्यायालयीन मोजणीमध्ये दाव्यातील वादीचे कथनामध्ये नमुद केलेप्रमाणे अतिक्रमण नसताना वादी हा दावा मिळकतीतील प्रतिवादी यांचे जागेत अतिक्रमण करुन आर.सी.सी. घराचे बांधकाम करु लागला आहे. वादीने बांधकाम पूर्ण केल्यास प्रतिवादीचे अपरीमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीस बांधकाम करु नये अशी तुर्तातूत ताकिद देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

(०२) प्रस्तुत कामी यातील वादी यांनी निशाणी क्रमांक १२८ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादीच्या अर्जास हरकत घेतली आहे. वादी यांचे कथन असे की, प्रतिवादी यांनी अर्जामध्ये वाद मिळकतीचे वर्णन अथवा मोजमापे, चतुःसिमा दिलेल्या नाहीत. त्यामुळे वादीच्या अर्जास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ कलम ३ ची बाधा येते. प्रस्तुत दावा हा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकिदीकरीता दाखल केला असल्याने प्रतिवादी यांना वादीचे विरुध्द तुर्तातूर्त ताकिद मागता येत नाही. त्याकरीता प्रतिवादी यांना प्रतिदावा दाखल करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नाही. प्रस्तुत अर्ज हा फक्त प्रतिवादी क्र. १ ने दाखल कलेला असुन, प्रस्तुत प्रतिवादी हा वाद मिळकतीचे लगत नसुन देखील प्रतिवादीचे क्षेत्रामध्ये बांधकाम करीत असल्याचे भासवुन सदरचा अर्ज दिलेला आहे. प्रस्तुत दावा प्रतिवादी यांनी वाद मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केले असल्याने दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये कोर्टामार्फत मोजणी झालेली आहे. तसेच वादीने देखील मोजणी करुन घेतलेली आहे. त्या दोन्ही मोजणीमध्ये वादमिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी पुर्व बाजुने अतिक्रमण करुन भिंत बांधल्याचे दिसुन आले आहे. पूढे वादी यांचे कथन असे की, वादी हे प्रतिवादी यांच्या पुर्व बाजुच्या असणा-या मिळकतीपासून १५ फुट खुली जागा सोडून बांधकाम करीत आहेत. त्यामुळे वादी हे प्रतिवादीच्या जागेत अतिक्रमण करुन बांधकाम करीत असल्याचे प्रतिवादी यांचे कथन अयोग्य व चुकीचे आहे. पूढे वादी यंचे कथन असे की,

प्रतिवादी यांनी वादी हे कोणत्या जागेत बांधकाम करीत आहेत त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री याकामी दाखल केलेला नाही. प्रतिवादी यांनी केवळ वादी यांना लवकर न्याय मिळू नये व केवळ दावा लांबविण्याच्या उददेशाने दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात येवुन रक्कम रुपये ३५,०००/– नुकसान भरपाई देणेबाबत व दंड रक्कम रुपये १०,०००/– करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

**(०३)** प्रतिवादीतर्फे वकीलांनी खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

| अ.न. | कागदपत्रांचे वर्णन. | नि. क्र. |
|---|---|---|
| १. | बांधकामाचा फोटो व पावती. | १२७/१ |

**(०४)** वादीतर्फे वकीलांनी खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

| अ.न. | कागदपत्रांचे वर्णन. | नि. क्र. |
|---|---|---|
| १. | विसापूर येथील गट क्र.१/२/१० चा ७/१२ उतारा. | १३१/१ |
| २. | मौजे विसापूर येथील फेरफार उतारा. | १३१/२ |
| ३. | मो.र.नं.१५२ चा नकाशा. | १३१/३ |
| ४. | वादी नं. ३ याचे मिळकतीचे फोटो. | २८ |

**(०५)** वादींनी त्यांचे अर्जाचे पृष्ठर्थ खालील वरीष्ठ न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे.

| अ.नं. | न्यायनिर्णय. |
|---|---|
| १. | एआयआर २०१५ कर्नाटक १३ श्रीमती शकुंतलम्मा व इतर विरुध्द श्रीमती कांथम्मा व इतर, दिनांक ०५/०९/२०१४. |

**(०६)** प्रतिवादीचा अर्ज, वादींचे म्हणणे, विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज निर्णीत करणेहेतु माझे समोर खालील वादप्रश्न उपस्थित होतात. त्यांचे सकारण स्पष्टीकरन व कारण मिमांसा मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **०१** | प्रतिवादीस सकृतदर्शनी खटला असल्यांचे प्रतिवादी शाबीत करतात काय ? | **नाही.** |
| **०२** | न्यायाचा तौलनीक कल प्रतिवादीच्या बाजूने आहे काय ? | **नाही.** |
| **०३** | प्रस्तुत अर्ज नाकारल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय ? | **नाही.** |
| **०४** | आदेश काय ? | **अर्ज नामंजुर करणेत आला.** |

## <u>कारणमिमांसा.</u>

### <u>वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ करिता.</u>

**(०७)** सदरील वादप्रश्न हे परस्परात गुंतले असल्याने तथ्यांची पुनरावृत्ती टाळणेहेतु तसेच विस्तार भयास्तव एकत्रीत विचारात घेतले आहेत.

दोन्ही बाजुच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कबुल तथ्यानुसार वादींनी हा दावा निरंतरचे मनाई साठी दाखल केला आहे. वाद मिळकत प्रतिवादीचे मालकीची नाही ही वस्तुस्थिती आहे. या ठिकाणी प्रतिवादीने आपल्या या तथ्यांच्या समर्थनात काय पुरावा दिला आहे हे बघणे आवश्यक आहे.

(०८) प्रतिवादीने याकामी नि.क्र.१२७/१ खाली दाखल केलेल्या वादीच्या आर.सी.सी.बांधकामाच्या फोटोचे अवलोकन केले असता, सदर फोटोमध्ये आर.सी.सी. बांधकाम सुरु असल्याचे दिसुन येते. परंतु याकामी प्रतिवादी यांनी वादी हे सदरचे बांधकाम कोणाच्या मालकीचे जागेत करत आहेत याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. यावरुन वादी हे प्रतिवादीच्या जागेत अतिक्रमण करुन बांधकाम करीत आहेत हे सिध्द होत नाही. तसेच प्रतिवादी यांनी याकामी वादीविरुध्द प्रतिदावा करणे आवश्यक होते. परंतू प्रतिवादीने याकामी वादीविरुध्द प्रतिदावा केल्याचे दिसुन येत नाही. तसेच वादी यांनी प्रतिवादीविरुध्द निरंतर मनाईकरीता दावा दाखल केला असुन त्या अनुषंगाने तीच मागणी कायदयाने प्रतिवादी यांना या दाव्याचे कामी करता येणार नाही. याउलट वादीने याकामी नि.क्र.१३१/१ कडे दाखल केलेला ७/१२ उतारा पाहता सदर उता–यावर वादी यांची नावे असल्याचे दिसुन येते. तसेच याकामी नि.क्र.१३१/३ कडे दाखल केलेला मोजणी नकाशा पाहता सदर नकाशामध्ये वादमिळकत ही वादीच्या वहिवाटीस असल्याचे दर्शविले आहे. तसेच वादी यांनी नि.क्र. १३१/४ कडे दाखल केलेला फोटो पाहता वादी हे प्रतिवादी

यांच्या बांधकामापासून खुली जागा सोडून बांधकाम करीत असल्याचे प्रथमसकृतदर्शनी दिसुन येत आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादीच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करीत असल्याचे शाबीत होत नाही. याचा विचार करता प्रतिवादीस सकृतदर्शनी खटला नाही, न्यायाचा तौलनिक कल प्रतिवादीचे बाजुने नाही आणी तुर्तातुर्त मनाई न दिलेस प्रतिवादीचे पैशात भरून न येणारे नुकसान होत नाही असेच अनुमान काढणे मला भाग आहे. सबब मी **वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ नकारार्थी** उत्तरी करुन **वादप्रश्न क्रमांक ०४** चे उत्तरा दाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**०१.** प्रतिवादीचा नि. क्र. १२४ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

**०२.** अर्जाचा खर्च प्रतिवादीवर राहील.

RITA SHESHRAO KULKARNI
Digitally signed by RITA SHESHRAO KULKARNI
Date: 2023.03.03 10:50:02 +0530

**तासगांव.**
दिनांक : ०२ मार्च २०२३.

(डॉ.आर.एस.कुलकर्णी)
सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – ०२ मार्च २०२३. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | –०२ मार्च २०२३. |
| आदेश अपलोड दिनांक | – ०२ मार्च २०२३. |